# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/01/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## अपघातात मृत्यू

१) पो.स्टे. बेला :– अंतर्गत ०३ किमी अंतरावर मौजा दहेली शिवार सोनेगाव ते बेला रोडवर दिनांक १७/०१/२०२४ चे १६.४५ वा. दरम्यान यातील **मृतक नामे– भाउरावजी पांडुरग आंबुलकर, वय ६५ वर्ष, रा. दहेली त. जि. नागपुर** हे शेतातुन पायदळ घरी येत असतांना रोड वरील कामावरील ग्रेडर मशीन क्र. एम. एच.–३१/एफ–३३८५ चे चालक **आरोपी नामे– अशोक युवराज वाघ, वय ४४ वर्ष, रा. लोणी त. जामनेर जि. जळगाव ह. मु. आष्टा त. जि. नागपुर** याने आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन मृतकाला धडक देवुन सदर ग्रेडर मशीनने ब्लेड मध्ये घेऊन घासत नेले त्यामध्ये फिर्यादीच्या वडीलांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादंवी सहकलम १३४, १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक अजित कदम यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक अजित कदम पोस्टे बेला मो. नं. ९११२९८५९२२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत ०४ किमी अंतरावर मौजा रूईखैरी शिवार जलसा ढाब्यासमोर दिनांक १७/०१/२०२४ चे सायं. ०४.३० वा. ते ०४.४५ वा. दरम्यान **फिर्यादी मृतक नामे– कु. वैष्णवी अरविंद शेंडे वय २३ वर्ष रा. हमदापुर वार्ड क्र. ०१ त. सेलु जि. वर्धा व फिर्यादीचा भाऊ मृतक नामे– शुभम** हे मोटरसायकल क्र. एम. एच. –३२/ए. व्ही– ०८७७ नी नागपुर वरून हमदापुर येथे डबल सिट जात असतांना रूईखैरी शिवारातील जलसा ढाब्यासमोरील रोडवर मागुन येणाऱ्या पांढऱ्या रंगाचे टॅकर क्र. जि जे.–१२/ बि. डब्ल्यु–२२८३ चा चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडवरील कट वरून अचानक वळण घेतल्याने मोटरसायकल टॅकरला धडकल्याने फिर्यादी ही गंभीर जखमी होवुन व फिर्यादीचा भाऊ गंभीर जखमी होवुन बेशुद्ध झाला व उपचारादरम्याण मरण पावला फिर्यादी व फिर्यादीचे भावाचे मरणास टॅकर क्र. जि जे.–१२, बि डब्ल्यु–२२८३ चा चालक हा कारणीभूत ठरला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी टॅकर चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवी सहकलम १३४, १८४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मेश्राम पोस्टे बोरी मो. क्र. ९९२३७९८६८८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर